# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


प्रेस नोट :- ४२१/२०२३ दिनांक - ०९/१२/२०२३

## ओला कॅबने प्रवास करत असतांना गहाळ झालेले रु ८०,०००/- रोख रक्कम व रु ५,००,०००/- किंमतीचे ८२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने तक्रारदार यांना परत मिळवुण देण्यास माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

फिर्यादी नामे सुरेशकुमार अर्जुनदास गुप्ता, वय ६४ वर्षे, रा. दिवानमान, वसई पश्चिम, जि. पालघर हे त्यांचे पत्नीसह दिनांक ०५/१२/२०२३ रोजी मालाड, मुंबई येथुन ओला कॅबने वसई पश्चिम येथे येत असतांना प्रवासादरम्यान त्यांचेकडे असलेली ८०,०००/- रोख रक्कम व रु ५,००,०००/- रु. किंमतीचे ८२ ग्रॅम सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग गहाळ झाल्याचे निदर्शनास आल्याने त्यांनी माणिकपुर पोलीस ठाणे येथे हजर होवुन झालेल्या घटनेबाबत माहिती दिली होती. सदर बाबत माणिकपुर पोलीस ठाणे गहाळ रजिस्टर क्र. ३७१४७/२०२३ अन्वये मिसिंग दाखल आहे.

सदर घटनेच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई यांचे सुचनेनुसार माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ दिवानमान परिसरात शोध घेवुन तेथील परिसरातील अनेक सि.सि.टी.व्ही कॅमेरे तपासुन तक्रारदार यांची रक्कम व दागिने ठेवलेली बॅग ही ते ओला कारमधुन उतरत असतांना दिवानमान परिसरात पडल्याचे कॅमेऱ्यामध्ये दिसुन आल्याने व सदरची बॅग ही एक अनोळखी इसम उचलतांना दिसुन आल्याने सदर इसमाचा सि.टी.व्ही कॅमेऱ्याव्दारे तसेच गुप्त बातमीदार यांचे मदतीने शोध घेवुन त्यांचेकडे तक्रारदार यांचे गहाळ झालेल्या रकमेबाबत व दागिन्यांबाबत कौशल्याने विचारपुस करुन तक्रारदार यांचे गहाळ झालेली रु ८०,०००/- रोख रक्कम व रु ५,००,०००/- किंमतीचे ८२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करुन तक्रारदार यांना परत केले.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौघुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्‌मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मिलिंद साबळे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री ऋषिकेश पवळ (पोलीस निरीक्षक प्रशासन) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि./सनिल पाटील, पो.हवा/शैलेश पाटिल, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, पो.शि./ गोविंद लवटे,आनंदा गडदे व प्रविण कांदे यांनी यशस्विरीत्या केलेली आहे.




**----------00000----------**